झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र. ५५

जा.क्र./झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/गाळे/सोडत/६४/सन २००३
मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन
प्राधिकरण,मुंबई यांचे कार्यालय,५ वा माळा,गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दिनांक : ०५/०९/२००३.

# प रि प त्र क

विषय :– लॉटरी पध्दतीने गाळ्यांचे वितरण करण्याबाबत...

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना गाळ्यांचे वितरण करताना शारिरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती किंवा महिला कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे अशांना प्रथम प्राधान्याने गाळ्यांचे वितरण करण्यात यावे असे झोपडपट्टी पुनर्वसन मार्गदर्शिकमध्ये नमूद केलेले आहे. तथापि अनेक योजनांमध्ये संस्थेचे पदाधिकारी संस्थेच्या संचालक मंडळासाठी २० % सदनिका, ६० वर्षावरील झोपडीधारक तसेच आजारी झोपडी धारक यांना प्राधान्याने गाळ्यांचे वाटप करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे गाळ्यांचे वितरण झाल्यानंतर या कार्यालयाकडे अनेक तक्रारी प्राप्त होतात. म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार पात्र झोपडीधारकांना सोडतीद्वारे करण्यांत येणारे गाळ्यांचे वितरण झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मार्गदर्शक सुचनांनुसार होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी पात्र झोपडीधारकांना गाळ्यांचे वितरण करण्यासाठी सोडत काढतांना ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामधील सहकार कक्षातील प्रतिनिधीच्या उपस्थितीत काढावी व इमारतीला वापर परवाना देतांना अभियांत्रिकी शाखेने संबंधित सोडत सहकार कक्षाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत झालेली आहे, याविषयी खात्री करूनच इमारत वापर परवाना / भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) द्यावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.